# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक 9 एप्रिल, 2013.
## (सकाळी 10.00 ते 11.45 वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना - (म.वि.प. नियम 101 अन्वये) -**

**(शुक्रवार, दिनांक 5 एप्रिल, 2013 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना - अनुक्रमांक 1 ते 5) -**

(1) **श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे, यांच्यामार्फत सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजनेतून जिल्हा परिषदेच्या शाळांना वाटप करण्यात आलेल्या पुस्तकांपैकी तिसरीच्या बालभारती (मराठी) पुस्तकातील तब्बल चार धडे गायब झाल्याचे तर 16 पाने पुनर्मुद्रित करण्यात आल्याचे आढळून येणे, तसेच राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यामिक मंडळाच्या इयत्ता नववीच्या सामाजिकशास्त्र पुस्तकाच्या नव्या आवृत्तीत इतिहास आणि राज्यशास्त्राशी निगडीत अनेक चुका असल्याचे निदर्शनास येणे, शुध्दलेखन आणि काही संकल्पनांबाबत चुका असून एका प्रकरणातील राष्ट्रध्वजावर अशोकचक्राचे चित्रच नसणे, तसेच, सीबीएसईच्या दहावीच्या अभ्यासक्रमातील विज्ञानाच्या पुस्तकात तब्बल 50 चुका असल्याचे निदर्शनास येणे, या पुस्तकांची निर्मिती करतांना विद्यार्थ्यांकडे स्वत:ची जाणीव, निर्णयक्षमता, समस्या निराकरण, परिणामकारक संप्रेषण, सृजनशील व चिकित्सात्मक विचार ही उद्दिष्टे समोर ठेवून पुस्तकांची रचना केली असतांना शुध्दलेखन व संकल्पना मधील तसेच मुद्रक आणि बांधणीतील अक्षम्य चुकांमुळे विद्यार्थ्यांच्या माथी सदोष पुस्तके मारण्यात येणे, या चुकांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(2) **डॉ. नीलम गोऱ्हे,** डॉ. अपूर्व हिरे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील स्कूल बसचा प्रश्न गंभीर असून मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद आदि शहरी भागात होत असलेले स्कूल बस अपघात, यात निष्पाप बालकांचा होत असलेला मृत्यू, तसेच माहे जानेवारी, 2013 च्या सुमारास मुंबईतील जुहू येथे तीन

वर्षाच्या मुलींवर शाळेच्या बसमध्ये झालेल्या लैंगिक अत्याचाराची घटना, राज्य शासनाने या शालेय बसगाड्याकरिता केलेल्या नियमावलींच्या विरोधात "स्कूल बस ओनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र" या संघटनेने उच्च न्यायालयात दावा दाखल करणे, न्यायालयाने शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षा अत्यंत महत्वाची असून त्यात कुठलीही तडजोड करता येणार नाही, असे नमूद करुन सुधारित नियमावलीत स्थगिती देण्यास नकार देणे, तथापि, प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने या नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी होत नसणे, शिक्षण हक्क कायद्यानुसार एक किलोमीटरच्या अंतरामध्ये राहणाऱ्या मुलांना प्रवेश देताना प्राधान्य देणे आवश्यक असतांना शाळा चालकांनी दूरवर राहणाऱ्या मुलांना प्रवेश देणे, या विद्यार्थ्यांना बससेवेची गरज भासणे, प्रवासाचा कालावधी जास्त असल्यानेही मुलांवरील लैंगिक अत्याचारासारखे प्रकार घडत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिकिया."

(3) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** अमरसिंह पंडित, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री. नागो गाणार**,** नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील ओ.बी.सी. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची 14,000 कोटी रुपये फी प्रलंबित राहिल्याने 10 लाख विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान, सर्व ओबीसी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेमध्ये भटक्या जाती-जमाती, विशेष मागास प्रवर्गाचा समावेश असणे, राज्य शासनाने आधी शिष्यवृत्तीची रक्कम द्यायची आणि नंतर केंद्र शासनाने त्याची प्रतिपूर्ती करावी अशा प्रकारचे योजनेचे स्वरुप असणे, 10 लाख ओबीसी विद्यार्थ्यांपैकी 3,34,000 विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व 55 हजार विद्यार्थ्यांच्या शुल्क माफीची 327 कोटी रुपये इतकी रक्कम अद्यापही मिळालेली नसणे, आगामी शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क यास 600 कोटी रुपयांची आवश्यकता असताना अर्थसंकल्पात केवळ 470 कोटी रुपयांचीच तरतूद करण्यात येणे, राज्य शासन ही योजना पुढे सुरु ठेवेल की बंद करेल याबाबत पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, शैक्षणिक सत्र सुरु होऊनही थकबाकी न दिल्याने शाळा, कॉलेज, महाविद्यालय यांच्याकडून विद्यार्थ्यांना वेठीस धरण्यात येणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये पसरलेली नाराजी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(4) **श्री. संदिप बाजोरिया वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व यवतमाळच्या वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालयामध्ये लॅप्रोस्कोपी मशीन खरेदीसाठी शिक्षण व संशोधन संचालनालयाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याची कार्यवाही सदोषपणे सुरु असल्याने मंजूर झालेला निधी व्यपगत (लॅप्स) होणार असणे, परिणामी, परिसरातील गोरगरीब नागरीक आधुनिक उपचारांना वंचित राहणार असणे, सदर महाविद्यालयांमध्ये लॅप्रोस्कोपी यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी शासनाने त्वरीत हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(5) **श्रीमती अलका देसाई वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मुंबईतील वडाळा येथील जे.के.नॉलेज सेंटरमधील भारतीय पुनर्रचना संस्था (औरंगाबाद) संचलित, मुंबई माध्यमिक विद्यालयातील जुन्या शिक्षकांना एक एक करुन कामावरुन काढून टाकण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी, 2013 च्या दरम्यान उघडकीस येणे, दिनांक 1 डिसेंबर, 2012 रोजी 2 शिक्षकांना, 20 डिसेंबर, 2012 रोजी लिपिकांना व मुख्याध्यापकांसहीत 7 शिक्षकांना, दिनांक 24 डिसेंबर, 2012 रोजी औरंगाबाद येथे बदली करण्यात येणे, व एका शिपायास तोंडी सांगून काढण्यात येणे, शाळेतील शिक्षक व पालक वर्गात निर्माण झालेली नाराजीची भावना याबाबतीत शासनाने तातडीने लक्ष घालून शाळेच्या शिक्षकांना त्वरीत कामावर घेऊन नियमित वेतन मिळण्यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(सोमवार, दिनांक 8 एप्रिल, 2013 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना - अनुक्रमांक 6 ते 10) -**

(6) **श्री. मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे या ब्रिटीशकालीन इमारतीस पुरातत्व विभागाने पुरातन वास्तु म्हणून जाहीर केले असून, तेथील मुद्रणालय व ग्रंथागाराच्या

इमारतींची अत्यंत दुरावस्था झाली असणे, काही इमारतींच्या स्लॅबला गळती लागली असून एका इमारतीला भले मोठे भगदाड पडले असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, जुनी कालबाह्य यंत्रे आणि शासनाच्या छपाई कामाचा वाढता ओघ, त्यातच मुद्रणालयातील रिक्त असलेली 154 पदे, यामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा पडणारा असह्य ताण, या मुद्रणालयास तातडीची व कालमर्यादेची कामे उत्कृष्ट केल्याबद्दल राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट छपाईची 71 पारितोषिके मिळालेली असूनही शासनाचे मुद्रणालयातील विविध समस्यांकडे होत असलेले दुर्लक्ष, इमारतीमध्ये अपंग कर्मचाऱ्यांना पाश्चात्य पध्दतीची शौचालय सुविधा करणे, कर्मचाऱ्यांना अतिकालीन भत्ता, शिलाई व धुलाई भत्त्यामध्ये वाढ करुन त्यासाठी निधीची तरतूद करणे, विविध शासकीय कार्यालयांची रुपये 150 कोटींची थकबाकी बिले तात्काळ अदा करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना व प्रतिक्रिया."

(7) **सर्वश्री चंद्रकांत पाटील,** विनोद तावडे, भगवान साळुंखे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पर्यटन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"कोल्हापूर जिल्ह्यातील भूदरगड हा तालुका पर्यटन विकासात मागास राहिल्याचे निदर्शनास येणे, या तालुक्यात दोन ऐतिहासिक किल्ले, तीन संतांच्या समाध्या आणि स्वातंत्र्यलढ्यात हुतात्म्य पत्करलेले सात वीर, अशी वीरांची आणि विद्वानांची भूमी असा नावलौकीक असणारा तालुका असूनही येथे पर्यटन विकास आणि औद्योगिक विकास न होणे, तसेच येथील महत्त्वाच्या धार्मिक स्थळांचाही विकास होणे आवश्यक असणे, परंतु याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने हा तालुका विकासापासून वंचित राहणे, येथील किल्ले, समाध्या, धार्मिक स्थळे यांचा विकास करण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(8) **डॉ. सुधीर तांबे,** सर्वश्री. चरणसिंग सप्रा, मितेश भांगडिया, विनोद तावडे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"मतिमंद मुकबधीर आणि अपंगांसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांची सेवानिवृत्तीसाठी सेवा विचारात घेताना, ती संस्था विनाअनुदानित असतांना झालेली सेवा ग्राह्य धरण्यात येत नसल्याने अनेक शिक्षक सेवानिवृत्ती वेतनापासून वंचित असणे, या संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांना निवृत्त होताना शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन योजनेचा लाभ

मिळतो, परंतू या शिक्षकांची संस्था विनाअनुदानित असतांना झालेली सेवा या योजनेसाठी ग्राह्य धरली जात नसणे, मात्र, शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील शाळांमधील शिक्षकांची सेवानिवृत्त होताना त्यांची विनाअनुदानित शाळेतील सेवा वेतन निश्चितीसाठी, वेतन वाढीसाठी उपदानासाठी व सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरली जाते, परिणामी, मतिमंद, मुकबधीर आणि अपंगांसाठी काम करणाऱ्या शाळांमधील शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.

(9) **सर्वश्री अमरसिंह पंडित,** सतीश चव्हाण **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात श्वेतकुष्ठ (कोड) या आजाराचे प्रमाण लोकसंख्येच्या 4 ते 8 टक्क्यांपर्यंत असणे, श्वेतकुष्ठ रुग्णांमध्ये महिला रुग्णांचे प्रमाण 67 टक्के इतके असणे, हा रोग 55 टक्के रुग्णांना वय वर्षे 10 ते 20 वयोगटात होणे, श्वेतकुष्ठ रुग्णास मधुमेह, उच्च रक्तदाब, केस गळणे, कर्ण बधीरता, मानसिक आजारांसारख्या रोगांची लागण होणे, राज्यात 14 लक्ष महिला आणि 8 लक्ष मुली या आजाराने त्रस्त असल्याचे एका खाजगी संस्थेच्या सर्व्हेक्षणात उघड होणे, महिला आणि पुरुष असे सुमारे 50 लाखांहून अधिक रुग्ण या आजाराने पिडीत असणे, रोगाविषयीच्या गैरसमजामुळे समाजाने या रुग्णांना बहिष्कृत करण्याचे प्रकार घडणे, श्वेतकुष्ठ रुग्णांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक, आर्थिक मदत शासन स्तरावरुन करण्याची आवश्यकता, या रुग्णांसाठी संजय गांधी किंवा श्रावणबाळ निराधार योजनांचा लाभ या रुग्णांना देण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(10) **श्री. गोपीकिसन बाजोरिया,** डॉ. रणजित पाटील, ॲड. अनिल परब **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"अकोला जिल्ह्यातील 1200 पेक्षा अधिक अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांना गेल्या एक वर्षापासून वाढीव वेतनातील फरकाची रक्कम प्राप्त न होणे, 55 लक्ष रुपये रक्कम शासनाकडे थकीत असणे, सन 2012 पूर्वीच्या 6 ते 7 महिन्याच्या वाढीव वेतनातील फरकाची रक्कम देण्याचे शासनातर्फे जाहीर करणे, त्यानंतर अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यात अंगणवाडी सेविका व मदतनिस यांना वाढीव वेतनातील फरकाची रक्कम देण्यात येणे, मात्र उर्वरित सहा तालुक्यांमध्ये ही रक्कम देण्यात न येणे, कुपोषण मुक्तीसाठी झटणाऱ्या

अंगणवाडी सेविका आणि मदतनिस यांना हक्काचे वेतन महिला व बालविकास विभागाला देता न येणे, त्यामुळे अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांमध्ये निर्माण झालेली चिड, असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(11) **सर्वश्री. विनोद तावडे,** चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री.रामनाथ मोते **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"भिवंडी तालुका व आजुबाजुच्या परिसरात अनधिकृत गोदामांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात होत असलेली वाढ, आजमितीस सुमारे 2 हजार अनधिकृत गोदामे या ठिकाणी कार्यरत असणे, शासनाची कोणतीही परवानगी न घेता विविध प्रकारच्या वस्तुंची व घातक रसायनांची साठवणूक त्यात करण्यात येत असणे, यामुळे अनेकदा सदरहू गोदामांना आग लागून झालेली जीवीत व वित्तहानी, कारवाई करण्यास एमएमआरडीए, पोलीस व महसूल विभागाचे अधिकारी स्वत:ची जबाबदारी नाकारुन एकमेकांवर आरोप करीत असणे, ही अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत अद्यापी कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, गोदाम मालक भाड्यापोटी लाखो रुपये मिळवित असताना शासनास मात्र कोणताही महसूल मिळत नसणे, या गोदाम मालकांकडून भाड्याच्या रकमेपैंकी 50 टक्के उत्पन्न शासनाने अनर्जित उत्पन्न म्हणून जमा केल्यास शासनाचे उत्पन्न दरवर्षी 120 कोटी रुपयांनी वाढण्याची शक्यता,शासनाची याबाबत तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रीया."

(12) **श्री. संजय दत्त,** प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. चरणसिंग सप्रा, मोहन जोशी, सुभाष चव्हाण, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"माहिम (मुंबई) येथील पोलीस वसाहतीची झालेली दुर्दशा, तसेच, नायगांव, भोईवाडा, भायखाळा व पुणे येथील ब्रिटिशकालीन पोलीस वसाहतीमध्ये सोयीसुविधा, दुरुस्तीची कामे अपूर्ण असणे, घर भाड्यापोटी माहिम येथील इमारतीतील निवासी पोलीसांकडून वर्षाला साडेसहा कोटीची वसूली केली जात असून या इमारतींच्या दुरुस्तीवर आतापर्यंत केवळ साडेचार कोटी रुपयेच खर्च करण्यात आलेले असणे, दुरुस्तीच्या नावाखाली मोठ्या रकमांची देयके काढून निधीचा दुरुपयोग करण्यात येणे, पोलीसांच्या घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी तसेच त्यांच्या कल्याणासाठी सन 1974 मध्ये पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाची

स्थापना करण्यात आली. मात्र, स्थापनेपासून आजपर्यंत या महामंडळाने फक्त 28 हजार 527 निवासस्थाने उपलब्ध करुन दिलेली असणे, राज्यात एक लाखाहून अधिक पोलीसांना घरेच उपलब्ध नसणे, त्यामुळे पोलीसांच्या निवासस्थानाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून याबाबत शासनाकडून तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(13)** **सर्वश्री. रमेश शेंडगे,** किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर आणि संगमनेर तालुक्यात सुमारे चार लाख मेंढ्या तर 9 लाख शेळ्या असणे, गाई, म्हशी, बैल आदि जनावरांसाठी छावण्या उभारण्यात येतात, तथापि शेळ्या मेंढ्यासाठी कोणतीही उपाययोजना शासनामार्फत करण्यात न येणे, परिणामी मेंढपाळांना आपल्या मेंढ्या स्वस्तात विकण्याची आलेली पाळी, याबाबत शेळ्यामेंढ्यांसाठी चारा, पाणी याबाबत उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करण्यांत येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(14)** **श्री. वसंतराव खोटरे,** डॉ. अपूर्व हिरे, डॉ. सुधीर तांबे, श्री. विक्रम काळे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"असोसिएटसची सेट (Associate CET) परिक्षा माहे मे 2011 मध्य घेवून दिनांक 6 सप्टेंबर, 2011 रोजी जमनालाल गोयंका दंत महाविद्यालय अकोला येथे तिसऱ्या फेरीमध्ये यादी घोषित करणे, दिनांक 12 सप्टेंबर, 2011 रोजीपर्यंत दिलेल्या अंतिम तारखेच्या यादीत 5 विद्यार्थ्यांचा मुदतीत प्रवेश घेणे, उर्वरित 34 विद्यार्थ्यांनी दिनांक 30 सप्टेंबर, 2011 रोजीपर्यंत सर्व अटी पूर्ण करुन प्रवेश होणे, दंत महाविद्यालयाच्या प्रवेशावर बंदी असूनही या संस्थेने याचिका क्रमांक 3982/2011 दाखल करुन प्रवेश बंदीवर स्टे ऑर्डर घेऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुरु होऊन अभ्यासक्रम पूर्ण होणे, माहे मे-जून 2012 मध्ये विद्यापीठाच्या परिक्षेला पात्र असून प्रविष्ठ होण्यासाठी परिक्षेचे प्रवेश पत्र विद्यापीठाने पाठविलेले नसणे, त्यामुळे 39 विद्यार्थी परिक्षेपासून वंचित राहणे, ह्या दंत महाविद्यालयाची मान्यता काढल्यामुळे परिक्षा होऊ न शकणे, या विरुध्द न्याय मागण्यासाठी मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ नागपूर येथे केस नं. 2502/12 नुसार दाखल करणे, याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिनांक 19 डिसेंबर, 2012 रोजी निर्णय देऊन महाराष्ट्र

शासनाला सर्व विद्यार्थ्यांचे राज्यातील इतर दंत महाविद्यालयात स्थलांतर करुन परिक्षा घेण्याचे आदेश देणे, ही प्रक्रिया दिनांक 28 फेब्रुवारी, 2013 रोजीपर्यंत पूर्ण करणे, भारतीय दंत परिषद (D.C.I.) यांनी महाराष्ट्र शासनास सर्व विद्यार्थ्यांना स्थलांतरीत करुन परिक्षा घेण्याबाबत दिनांक 16 मार्च, 2013 च्या पत्राद्वारे लेखी कळविणे, याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा.आरोग्य व वैद्यकीय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सर्व विद्यार्थ्यांच्या सहीनिशीचे एक निवेदन मा.जिल्हाधिकारी, जि.अकोला यांचेमार्फत दिनांक 25 मार्च, 2013 रोजी किंवा त्यादरम्यान पाठविणे, परंतू अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही शासनाकडून न होणे, याबाबत शासनविषयी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम व पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भुमिका व प्रतिक्रिया."

(15) **डॉ. दिपक सावंत वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय शिक्षण मंडळाच्या (बोर्ड) एच.एस.सी. इयत्ता बारावी (H.S.C.) परिक्षेच्या वेळी माहे फेब्रुवारी-मार्च, 2013 मध्ये झालेल्या अनेक परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांना पेपर मध्ये अडचणी असल्यास समजावून सांगण्यासाठी परीक्षेच्या ठिकाणी त्या विषयातील एकही जाणकार नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्न पत्रिकेच्या स्वरुपाबद्दल उचित मार्गदर्शन मिळण्यात निर्माण झालेल्या अडचणी,परिणामी बारावीच्या फिजिक्सच्या पेपरला विद्यार्थी संभ्रमात पडणे, नियोजित वेळेत पेपर पूर्ण न होणे, परिणामी विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान आणि या संदर्भात मंडळाकडे तक्रारी करुनही कोणतीही कारवाई न होणे, परिणामी विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## (दुपारी 12.00 वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**कृषी मंत्री** : "परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठाने बांधकाम विभागात केलेला गैरव्यवहार" या विषयावरील श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.एम.एम.शेख, श्री.हेमंत टकले,

श्री.रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 33437 ला दिनांक 11 डिसेंबर, 2012 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे-**

**(1) उद्योग मंत्री : (अ)** "पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2011-2012 या वर्षाचा एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "कोंकण विकास महामंडळ मर्यादितचा सन 2004-2005 या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल व लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(2) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री : (अ)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन 2009-2010 व 2010-2011 या वर्षांचा अनुक्रमे सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(क)** "पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक लेखे संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड)** "सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ई)** "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल"

सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समितीचा दुसरा अहवाल (2012-2013) सादर करणे व त्यावर विचार करणे.**

**चार : म.वि.प. नियम 93 अन्वये सूचना - (असल्यास).**

**पाच : म.वि.प. नियम 93 अन्वये निवेदन - (असल्यास).**

**सहा : लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**गृहमंत्री** : "मौजे केट्टापाट (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) येथील रिक्षा अपघातामध्ये 14 जणांचा झालेला मृत्यू " श्री.हेमंत टकले व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिनांक 28 जुलै, 2011 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**सात : म.वि.प. नियम 101-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**आठ : म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव -**

**(अ) (सोमवार, दिनांक 8 एप्रिल, 2013 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रस्ताव) -**

**सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ. दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजीत पाटील, सर्वश्री. नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा प्रस्ताव -**

"गत 36 महिन्यात वीजेचे दर तब्बल 12 वेळा वाढणे, औद्योगिक वीजेचे दरदेखील शेजारील राज्यांपेक्षा अधिक असल्याने सर्व उद्योजकांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारून तो यशस्वी करणे, वारंवार वीज दरवाढ करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने कोणातही विरोध न करता मंजूर करणे, भारनियमनमुक्तीसाठी महानिर्मितीच्या औष्णिक विद्युतनिर्मिती प्रकल्पांची वीजनिर्मिती

वाढविण्याची गरज असताना प्रत्यक्षात सद्य:स्थितीत महानिर्मितीच्या औष्णिक वीज प्रकल्पांमार्फत होणारी वीज निर्मिती सन 2008 च्या तुलनेत कमी होणे, तसेच उरण व लातूर येथील गॅसवर आधारित विद्युत निर्मिती प्रकल्पामधून अपेक्षित विद्युत निर्मिती न होणे, प्रत्यक्ष वीजनिर्मितीत वाढ न झाल्याने माहे डिसेंबर, 2012 अखेर राज्य भारनियमनमुक्त करण्याची घोषणा फसवी ठरणे, कृषीपंपांना मोफत वीज पुरविण्याची घोषणा करूनदेखील कृषीपंप धारकांकडून वाढीव दराने वीज बील आकारण्यात येणे, महाराष्ट्रातील महावितरण, महापारेषण व महाजनको या तीनही कंपन्यांचे कामकाजामध्ये प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याचे उघडकीस येणे, यामध्ये प्रामुख्याने मीटर खरेदी, कोळसा खरेदी, पायाभूत सुविधांची कामे, महापारेषणमार्फत होणारी कामे इत्यादींचा समावेश असणे, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीज कंपन्यांचे काम समाधानकारक नसल्याचे शुंगलु समितीने देखील आपल्या अहवालात नमूद करणे, परिणामी, वाढत्या वीजदराचा बोजा सामान्य जनतेवर पडत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, यामुळे या विभागातील कारभाराबाबत श्वेतपत्रिका काढण्याची होत असलेली मागणी व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ब)** **सर्वश्री. किरण पावसकर,** अशोक ऊर्फ भाई जगताप, हेमंत टकले, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विक्रम काळे, निरंजन डावखरे, मुझफ्फर हुसेन सय्यद, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.जयवंतराव जाधव, नरेंद्र पाटील, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. रमेश शेंडगे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्ताव -**

देशाची आर्थिक राजधानी व सर्वात जास्त उत्पन्न असणारी मुंबई महानगरपालिका तसेच झपाट्याने शहरीकरण होत असलेली ठाणे महानगरपालिका व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरावस्था, याठिकाणी वाढत असलेल्या झोपडपट्टया व वाढत असलेली लोकसंख्या यामुळे तेथील नागरिकांना नागरी सुविधा न मिळणे, मुंबई महानगरपालिकेत रिक्त असलेले भूखंड विकासकांना देवून त्याठिकाणी टॉवर व मॉल उभे असणे, विकासकांबरोबर संगनमत करुन भूखंड विकासकांच्या ताब्यात देण्याचे सुरू असलेले प्रकार, यात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार होणे, झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत अनियमितता असून पात्र झोपडपट्टीधारकांना डावलून बनावट सभासद नोंदवून करण्यात येत असलेला प्रचंड भ्रष्टाचार, म्हाडाच्या संक्रमण

शिबिरात सुरू असलेली घुसखोरी, नागरिकांना अत्यंत अपुरा पाणीपुरवठा होणे, यासाठी महिलांनी वेळोवेळी धरणे व आंदोलन करणे, बऱ्याच ठिकाणी अस्वच्छता असून जागोजागी कचऱ्यांचे ढीग असणे, मोठ्या प्रमाणात सुरु असलेली बेकायदेशीर बांधकामे, टपऱ्या भंगारवाल्यानी रस्त्यावर केलेले अतिक्रमण यामुळे नागरिकांना रस्त्यांवरुन चालणेही जिकिरीचे होणे, मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईन्स अत्यंत जीर्ण झाल्या असून पाईप लाईनच्या शेजारी मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वाढणे, या झोपडपट्टीत दहशतवादी लपून राहण्याची शक्यता, त्यामुळे सुरक्षेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, रस्ते दुरुस्तीच्या कामात झालेला कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार, मुंबईत कोलमडून पडलेली वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस मालमोटारी व गाड्यांची वाढत असलेली संख्या, वाहतुकीची होत असलेली कोंडी कमी करण्याची व वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची आवश्यकता, मेट्रोरेल्वे व जलवाहतूक सुरू करण्याबाबत जनतेची होत असलेली मागणी, बऱ्याच ठिकाणी एमएमआरडीएची सुरू असलेली कामे संथगतीने सुरू असणे, या कामात बऱ्याच ठिकाणी झालेले अपघात, त्यात झालेली प्राणहानी, सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत न ठेवल्याने दूषित पाण्यामुळे मुंबई शहरात डेंग्यु, मलेरिया रोगाची साथ मोठ्या प्रमाणात पसरणे, यात बऱ्याच लोकांचा झालेला मृत्यु, पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी तुंबून मुंबईतील जगजीवन ठप्प होणे, मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील बरीचशी नैसर्गिक तलाव व तळी बुजवून त्यावर अनधिकृत बांधकामे सुरू असणे, मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांची झालेली दुरावस्था, रुग्णांना औषधोपचार वेळीच न मिळणे, मुंबईतील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात महापालिकेला आलेले अपयश, या समस्यांमुळे तेथील जनतेत निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी.

**नऊ : शासकीय विधेयके -**

**(अ) विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे -**

सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 2 - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2013.

**(क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 2 - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या

47 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा**

**प्रस्ताव :-**

" सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 2 - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 45 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ब) **विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 5 - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2013.

(क) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 5 - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 47 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा**

**प्रस्ताव :-**

" सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 5 - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 45 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 5 - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा)

विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 40 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**दहा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम 92 अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(1) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.**

"राज्यातील वृध्दांसाठी शासनाने आखलेल्या योजनांची अंमलबजावणी करणेबाबत" या विषयावरील डॉ.दिपक सावंत, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 37714 ला दिनांक 12 मार्च, 2013 रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(2) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.**

"मराठवाड्यातील 26 तालुक्यात भीषण दुष्काळ पडल्याबाबत" या विषयावरील श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 34885 ला दिनांक 14 डिसेंबर, 2012 रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : 8 एप्रिल, 2013.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.